# ा धक्कादायक !

## अमेरिका, फ्रान्स, इस्रायलची पाकवर टीका

वॉशिंग्टन : मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड झकीउर रहमान लख्वीची सुटका धक्कादायक व निराशाजनक असल्याचे सांगत अमेरिका, फ्रान्स व इस्रायलने पाकिस्तानची ही कृती अत्यंत निषेधार्ह असल्याची टीका केली आहे.

लाहोर उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर शुक्रवारी कुख्यात दहशतवादी संघटना 'लष्कर-ए-तोयबा'चा कमांडर झकीउर रहमान लख्वीची सुटका करण्यात आली होती. त्यानंतर जगभरातून पाकवर टीकेची झोड उठली आहे. लख्वीची सुटका ही पाकला स्वतःचा नाश घडवून घेण्यासाठी मदत करणारी ठरेल, अशी कडवट टीका करत अमेरिकेने पाकला दहशतवादाच्या मुद्यावर गांभीर्य दाखवण्याचे आवाहन केले आहे. अमेरिकेने आपल्या चिंता पाकच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढे व्यक्त केल्या आहेत. दहशतवादाविरोधातील लढाई सर्वच देशांची सामूहिक जबाबदारी आहे. मुंबई हल्ल्यातील गुन्हेगारांना पकडण्यासाठी पाकने गांभीर्य दाखवले पाहिजे, असे अमेरिकन परराष्ट्र मंत्रालयाचे उपप्रवक्ते जेफ रथके यांनी म्हटले आहे. फ्रान्सचे अध्यक्ष फ्रँकोस होलांद यांनीही लख्वीची सुटका दुर्दैवी असल्याचे म्हटले आहे. लख्वीची सुटका अत्यंत दुर्दैवी असून, ही बाब भारतच नाही तर संपूर्ण जगासाठी चांगली नाही. या मुद्यावर फ्रान्स भारताच्या पाठीशी आहे, असेही फ्रान्सने म्हटले आहे. इस्रायलनेही लख्वीची सुटका धक्कादायक व निराशाजनक असल्याची टीका केली आहे. पाकिस्तानातील घटनाक्रमामुळे दहशतवादाविरोधातील जागतिक लढ्याला धक्का बसला आहे. दहशतवादाच्या लढ्यात इस्रायलचा भारताला पाठिंबा आहे, असे इस्रायलच्या राजदूतांनी एका निवेदनाद्वारे म्हटले आहे.

दरम्यान, १६६ जणांचा बळी गेलेल्या मुंबई हल्ल्यात दहशतवाद्यांनी नरिमन हाऊसवर हल्ला करून इस्रायलच्या नागरिकांना लक्ष्य केले होते.


C-BUILDING BASEMENT, INGALE ARCADE SARJEPURA, A.NAGAR
CONTACT - 8888113555/ 8007569134/ 9657173939
INTERVIEW DATE : 13 & 14/04/2015 TIME : 2pm TO 6pm
AUR2015M 201026672

Sulochana Belhekar Samajik & Bahu Uddheshiya Shikshan Sanstha's
(Approved by AICTE, New Delhi & Affiliated to University of Pune )
SANT DNYANESHWAR INSTITUTE OF MANAGEMENT AND BUSINESS ADMINISTRATION,BHANSHIWARE. TAL NEWASA DIST.AHMEDNAGAR.

**WANTED**

Application are invited for the following posts .

| Sr No | Sub. | Post | Total Post | Open | SC | ST | VJ-A | OBC |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | MBA | Director | 01 | 01 | - | - | - | - |
| 02 | MBA | Asso. Professor | 02 | 01 | 01 | - | - | - |
| 03 | MBA | Asst. Professor | 03 | 01 | 01 | 01 | - | - |
| 04 | MBA | Librarian | 01 | 01 | - | - | - | - |

Qualification ,Experience Scale of Pay & allowances are as per AICTE / University of Pune Norms. Eligible & Candidates interested candidates should submit complete copy of Bio-data with passport size photograph along with attested copies of all supporting certificate within 5 days from the date of the advertisement to the institute reserve category candidates should send one copy of application to the Dy. Registrar (Reservation Cell ) University of Pune Ganeshkhind ,Pune -7 along with caste certificate & other related documents.

Secretary
Sulochana Belhekar Samajik & Bahu
Uddhesiya Shikshan Sanstha

(AUR2015N.301026729)




(AUR2015N.301026784)